**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०३ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **माहिती अधिकार कायद्यातल्या बदलांना स्थगिती देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.**
2. **माओवाद विरोधी कामगिरीची दखल घेत गडचिरोलीतील पाच सहाय्यक पोलीस निरीक्षकांना वेगवर्धित पदोन्नती.**
3. **यवतमाळमध्ये एमपीएससीच्या ऑनलाइन परीक्षा विरोधात परीक्षार्थी युवक-युवतींचा निषेध मोर्चा.**
4. **येत्या ७ जुलैपर्यंत विदर्भात सर्वत्र वादळी पर्जन्यमानासह पावसाचा इशारा.**

-----------------------------------

माहिती अधिकार

राज्यात माहिती अधिकार कायद्यातल्या बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे आणि राज्यातल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी कायद्यातले बदल मागं घेण्याची मागणी केली होती. या मागणीसाठी पाच जुलैपासून आंदोलनाचा इशारा अण्णा हजारे यांनी दिला होता. त्यानंतर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात माहिती आयोगाला पत्र पाठवलं.

-----------------------------------

पोलिस निरीक्षकांना पदोन्नती

माओवादविरोधी अभियानात बजावलेल्या धाडसी आणि उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गडचिरोली पोलीस दलातील पाच सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षकपदी वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली आहे. शुक्रवारी मुंबई इथल्या पोलीस महासंचालक कार्यालयात आयोजित समारंभात पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते त्यांना ही पदोन्नती बहाल करण्यात आली. पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये योगिराज जाधव, सचिन झनक, बाबासाहेब दुधाळ, सुनील बागल आणि राहुल देव्हडे यांचा समावेश आहे. गडचिरोलीसारख्या अतिसंवेदनशील आणि माओवादग्रस्त जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत धैर्य, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेनं

सेवा बजावल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. पाचही सहायक पोलीस निरीक्षकांच्या खांद्यावर पोलीस निरीक्षकपदाची चिन्हं लावून त्यांचा सन्मान करण्यात आला. गडचिरोली पोलीस दलाला आजपर्यंत ३ शौर्यचक्र, ६ राष्ट्रपती पोलीस शौर्य पदकं, ३३८ पोलीस शौर्य पदकं, २० राष्ट्रपती गुणवत्ता सेवा पदकं, १ हजार ५१० पोलीस महासंचालक पदकं तसंच ४०४ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेगवर्धित पदोन्नती मिळाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

----------------------------------

सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट

गडचिरोली नगर परिषदेच्या अमृत योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) प्रकल्पासाठी मौजा गडचिरोली इथली २ पूर्णांक ४ हेक्टर शासकीय जमीन, भोगवट्यानं उपलब्ध करून देण्यास राज्य शासनानं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानं प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल आणि  वन विभागानं यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, नियमानुसार जमीन नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था अधिक सक्षम होऊन स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्याला मोठा लाभ होणार आहे. मंजूर जमीन केवळ एसटीपी प्रकल्पासाठीच वापरण्याची अट शासनानं घातली आहे.

----------------------------------

विधिमंडळ

मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं कुठल्याही प्रकारे खासगीकरण करणार नसल्याचं सरकारनं आज विधानसभेत स्पष्ट केलं. कारभार सुधारण्यासाठी या संस्थेची जबाबदारी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे देऊ, अशी घोषणा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. संस्थेला दीडशे कोटी रुपये देण्याचं आश्वासन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं होतं. त्या प्रस्तावावर वित्त विभागानं काही त्रुटी काढल्या आहेत. याप्रकरणी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन तोडगा काढू असं झिरवाळ म्हणाले. आजच्या विधिमंडळ कामकाजाची माहिती देत आहे आमचे प्रतिनिधी.....

***(व्हॉइस कास्ट- वीणा डोंगरवार)***

***स्टिंग या एनर्जी ड्रिंकमध्ये काही घातक रसायनं आढळून आली आहेत, जी लहान मुलांसाठी योग्य नाहीत, त्यामुळे शाळेच्या ५०० मीटर परिसरात त्याच्या विक्रीवर***

*बंदी घातली जाईल, अशी घोषणा  अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी  विधानसभेत केली. शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांचं प्रबोधन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असंही ते म्हणाले. भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांचं काटेकोर पालन केलं जाईल, असं मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. राज्यात १४ लाख ८० हजाराहून अधिक भटके कुत्रे असून २ लाखाहून अधिक भटक्या कुत्र्यांचं लसीकरण आणि १ लाख ८० हजाराहून अधिक कुत्र्यांच निर्बीजीकरण झाल्याची माहिती त्यांनी दिली.चंद्रपूर-गडचिरोलीत हत्ती आणि मानव संघर्ष तीव्र झाला असून हत्तीच्या हल्ल्यात आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाला आहे. या घटना थांबवण्यासाठी विशेष टास्क फोर्स स्थापन करण्याची मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. विविध विद्युत कायद्यानुसार राज्यात पोस्टपेड स्मार्ट मीटर बंधनकारक असल्याची माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी विधानसभेत दिली. स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढते हा गैरसमज असल्याचं त्या म्हणाल्या. १ एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या सहा महिन्यांत राज्य महिला आयोगाकडे महिला अत्याचाराच्या १६ हजार ६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २ हजार ७७७ तक्रारी प्रलंबित आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली. एकंदर तक्रारींपैकी ४ हजार ४९७ तक्रारी या बलात्कार, बालविवाह, हुंडा, लैंगिक भेदभाव, जातीभेद, सायबर गुन्हे अशा सामाजिक समस्यांचा असून यातल्या ७३३ तक्रारी प्रलंबित आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या १७६ पैकी ४८ तक्रारी प्रलंबित आहेत, असंही उत्तरात नमूद आहे.(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी वीणा डोंगरवार)*

-----------------------------------

पंतप्रधान दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. राजस्थानात जोधपूर इथं ते विमानतळाच्या नवीन इमारतीचं उद्घाटन करतील. ४८० कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता २० लाख इतकी आहे. सुधारित उडान योजनेचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होईल. त्याखेरीज बालोत्रा इथं एक लाख सहा हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी ते करतील. पाचपदरा इथं ग्रीनफील्ड एकात्मिक तेलशुद्धीकरण आणि पेट्रोकेमिकल्स संकुलाचं लोकार्पण, जयपूर मेट्रोच्या

दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी यांचा त्यात समावेश आहे. राजस्थान सरकारमध्ये नोकरी मिळालेल्या ५४ हजार युवकांना पंतप्रधानांच्या हस्ते नियुक्तीपत्राचं वाटप होईल. गुजरातमध्ये सीजी सेमीकंडक्टर असेंबलिंग आणि चाचणी कारखान्याचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. देशाच्या सेमीकंडक्टर अभियानातल्या पहिल्या ४ कारखान्यांपैकी एक गुजरातमध्ये साणंद इथं साडेसात हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभा राहणार आहे.

----------------------------------

निषेध मोर्चा

एमपीएससीच्या ऑनलाइन परीक्षा आणि  नॉर्मलायझेशन पद्धतीच्या विरोधात स्पर्धा परीक्षार्थी युवक-युवतींनी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढून ठिय्या आंदोलन केलं. एमपीएससी परीक्षा पूर्वीप्रमाणं ऑफलाइन पद्धतीनं घेण्याची, पेपरफुटीतील दोषींवर कठोर कारवाई करण्याची, परीक्षा शुल्क कमी करण्याची आणि परीक्षांचं निश्चित वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी निवेदनाद्वारे केली.

----------------------------------

लोकशाही दिन

नागपूर महानगरपालिकेच्या वतीनं सोमवार दि.6 जुलै रोजी डॉ.पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृह, सिव्हिल लाईन्स  इथं लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. जनतेच्या तक्रारींचं निराकरण करण्याच्या दृष्टीनं महिन्याचा पहिला सोमवार 'लोकशाही दिन' म्हणून आयोजित करण्यात येतो.

----------------------------------

भूमिपूजन

खासदार अमर काळे यांच्या स्थानिक विकास निधीतून वर्धा जिल्ह्यातील  सेलू तालुक्यातील चानकी इथं सुमारे ९ लाख रुपये खर्चाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचं भूमिपूजन करण्यात आलं. यानंतर खासदार काळे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून स्थानिक समस्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत उर्वरित प्रश्नही प्राधान्यानं सोडविण्याचं आश्वासन दिलं.

----------------------------------

लोखंडी पूल नागपूर

पावसाळ्यात नागपूरच्या लोखंडी पुलाखाली साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मनपा आयुक्त डॉ.विपीन यांनी या परिसराची

पाहणी केली. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी नवीन ड्रेनेज व्यवस्था उभारण्याबाबत आठवडाभरात ठोस निर्णय घेण्याचे निर्देश त्यांनी मध्य रेल्वे प्रशासनाला दिले. तसंच सध्या साचलेलं पाणी तातडीनं पंपाद्वारे उपसण्याचे आदेशही संबंधित विभागाला देण्यात आले.

----------------------------------

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या सात जुलैपर्यंत वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला असून या दरम्यान अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. आज बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून नागपूरसह उर्वरित जिल्ह्यांमध्ये जोरदार पर्जन्यवृष्टीचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आ. उद्या देखील यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान, आगामी काही तासांमध्ये वर्धा जिल्ह्यात तुरळ ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी पडण्याची शक्यता असून अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात देखील पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

----------------------------------

क्रिकेट

भारतीय क्रिकेट संघ पुढच्या महिन्यात श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. १५ ते २७ ऑगस्ट दरम्यान दोन कसोटी सामने होतील. ही मालिका 'आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद 2025-27' या स्पर्धेचा भाग आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ खेळेल. जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद गुणतालिकेत भारत पाचव्या स्थानावर आहे.

----------------------------------

हिवताप

गोंदिया जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित आणि खासगी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचं हिवतापाबाबत जलद ताप सर्वेक्षण सुरू करण्यात आलं आहे. सीमावर्ती भागांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये हिवतापाचा धोका लक्षात घेऊन आरडीके किटद्वारे रक्त तपासणी केली जात आहे. ताप, अंगदुखी, सर्दी किंवा इतर लक्षणं दिसल्यास तातडीनं रक्त तपासणी करून जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत, असं आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी केलं आहे.

आश्रमशाळांनी परिसर स्वच्छ ठेवणं, पाणी साचू न देणं आणि डास प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

---------------------------------

राजभाषा अंमलबजावणी

माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात हिंदी भाषेचा वापर झपाट्यानं वाढत असून राजभाषा अंमलबजावणीसाठी व्यापक चिंतनाची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केलं. विद्यापीठाच्या पदव्युत्तर हिंदी विभागात आयोजित राजभाषा संमेलनात त्या बोलत होत्या. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हिंदीचा शिक्षण, तंत्रज्ञान, ई-गव्हर्नन्स, डिजिटल मीडिया आणि उद्योग क्षेत्रातील वाढता वापर अधोरेखित केला. या संमेलनात शहरातील विविध शासकीय कार्यालयांतील ५५ राजभाषा अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

---------------------------------